# पुणे विद्यापीठ

## शासनमान्य शिक्षकेतर पदांसाठी जाहिरात

पुणे विद्यापीठ कार्यालयातील खालील गट-क आणि गट-ड मधील शिक्षकेतर सेवकांची शासनमान्य रिक्त पदे सरळ सेवा प्रवेशाने भरण्यासाठी उमेदवारांकडून विहीत नमुन्यात महाराष्ट्र ज्ञान महामंडळ,पुणे (MKCL) यांच्या मार्फत ऑनलाईन (Online) अर्ज शनिवार, दि.१३ जुलै, २०१३ पर्यंत मागविण्यात येत आहेत. वरिष्ठ तंत्रसहायक (इलेक्ट्रॉनिक्स/बायोइन्फॉर्मेटिक्स), दस्तऐवजकार, कनिष्ठ अभियंता(स्थापत्य), तांत्रिक सहायक (फोटोग्राफी), ड्रॉफ्टसमन (स्थावर/रसायनशास्त्र), सांख्यिकी सहायक, रासायनिक विश्लेषक (भूशास्त्र), तंत्रसहायक (भूशास्त्र), सर्वेक्षक (पुरातत्व), तांत्रिक सहायक (ग्रंथालय), कार्यशाळा कार्यदेशक, प्रमुख भांडाररक्षक, मिस्त्री (स्थावर), प्रयोगशाळा तंत्रज्ञ, सहायक सुरक्षा अधिकारी, बांधकाम सहायक, तंत्रसहायक (प्राणिशास्त्र), शुष्क वनस्पतीरक्षक (वनस्पतीशास्त्र), वरिष्ठ लिपीक, लघुटंकलेखक (मराठी), सुतार, वायरमन, कनिष्ठ सहायक (सर्वसाधारण), कनिष्ठ सहायक (लेखा), तंत्रज्ञ नि आरेखक (रसायनशास्त्र), कनिष्ठ लिपीक, वाहनचालक, संग्रहालय स्वच्छक, ग्रंथालय परिचर, खानसामा नि अतिथीगृह परिचर, कुशल कामगार, झेरॉक्स् ऑपरेटर, अंधारखोली सहायक, वनस्पती समाहारक (वनस्पतीशास्त्र), सेक्शन कटर ग्रांइंडर (वनस्पतीशास्त्र), चक्रमुद्रित यंत्रचालक, शिपाई, ग्रंथालय शिपाई, पहारेकरी, हमाल, आरोग्य परिचर (आरोग्य केंद्र), प्रयोगशाळा मदतनीस या पदनामांची शैक्षणिक अर्हता, पदनिहाय आरक्षण, अनुभव, वयोमर्यादा आणि वेतनबँड, ग्रेड वेतन व अर्ज करण्यासंबंधीची संपूर्ण माहिती विद्यापीठाच्या www.unipune.ac.in व महाराष्ट्र ज्ञान महामंडळ, पुणे (MKCL) यांच्या http://oasis.mkcl.org/unipune2013 या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

जाहिरात क्र.: २७ डॉ.नरेंद्र मा. कडू

दिनांक : २२/०६/२०१३ कुलसचिव

# पुणे विद्यापीठ

## - शासनमान्य शिक्षकेतर पदांसाठी जाहिरात -

(विस्तृत जाहिरात विद्यापीठ व एम.के.सी.एल च्या संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी)

पुणे विद्यापीठ कार्यालयातील खालील गट-क आणि गट-ड मधील शासनमान्य रिक्त पदे सरळ सेवेने भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडून विहीत नमुन्यात महाराष्ट्र ज्ञान महामंडळ,पुणे (MKCL) यांच्या मार्फत ऑनलाईन **(Online)** अर्ज मागविण्यात येत आहेत. **प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करावा.**

| **अ. क्र.** | **पदनाम, वेतनबँड व ग्रेड वेतन** | **पदाचा गट** | **पद संख्या** | **आरक्षण** | **शैक्षणिक अर्हता व अनुभव** |
|---|---|---|---|---|---|
| १. | **वरिष्ठ तंत्रसहायक** (इलेक्ट्रॉनिक्स/बायोइन्फॉर्मेटिक्स)<br>वेतन बँड : रू.९३००-३४८००<br>ग्रेड वेतन : रु.४४०० | क | **०२** | **खुला - ०२** | १. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.एस्सी. (इलेक्ट्रॉनिक्स सायन्स/इन्स्ट्रुमेंटेशन सायन्स) पदवी परीक्षा उत्तीर्ण किंवा पदविका (इलेक्ट्रॉनिक्स/ इन्स्ट्रुमेंटेशन) परीक्षा उत्तीर्ण.<br>२. डिझाईन, डेव्हलपमेंट, रिपेअरिंग आणि मेंटेनन्सचा, इलेक्ट्रॉनिक्स/इलेक्ट्रिकल्स साधने व उपकरणे, डेव्हलपमेंट आणि ॲनॉलॉग दुरुस्ती आणि डिजीटल सर्क्युटरी, पीरिऑडिक आणि नियमित इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स विविध मशीनरींचा आणि ॲक्सेसरिजच्या देखभालीचा प्रत्यक्ष कामाचा पदवीधारकांसाठी तीन वर्षांचा आणि पदविकाधारकांसाठी पाच वर्षांचा अनुभव.<br>३. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |
| २. | **दस्तऐवजकार**<br>वेतन बँड : रू.९३००-३४८००<br>ग्रेड वेतन : रु.४४०० | क | **०१** | **खुला - ०१** | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी. लिब. परीक्षा उत्तीर्ण. ग्रंथालयाच्या सर्व कामात संगणकाचा वापर करण्यासंबंधीचे ज्ञान.<br>२. किमान तीन वर्षांचा शैक्षणिक/शासकीय ग्रंथालयातील कामाचा अनुभव.<br>३. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |
| ३. | **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)**<br>वेतन बँड : रू.९३००-३४८००<br>ग्रेड वेतन : रु.४४०० | क | **०१** | **खुला - ०१** | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी पदवी परीक्षा उत्तीर्ण अथवा स्थापत्य अभियांत्रिकी पदविका परीक्षा उत्तीर्ण.<br>२. शैक्षणिक/ औद्योगिक/ शासकीय संस्थेमधील प्रत्यक्ष इमारत बांधकाम व पर्यवेक्षण तसेच दैनंदिन कामाचे पर्यवेक्षण, पत्रव्यवहार व करारनामे, अंदाजपत्रके तयार करणे इत्यादी कामाचा पदवीधारकांसाठी तीन वर्षांचा आणि पदविकाधारकांसाठी पाच वर्षांचा अनुभव.<br>३. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |

| अ. क्र. | पदनाम, वेतनबँड व ग्रेड वेतन | पदाचा गट | पद संख्या | आरक्षण | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| ४. | **तांत्रिक सहायक (फोटोग्राफी)**<br>वेतन बँड : रू.९३००-३४८००<br>ग्रेड वेतन : रु.४४०० | क | **०२** | **अनु जमाती - ०१**<br>**विजा (अ) - ०१** | १. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेतील पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>२. छायाचित्रण (फोटोग्राफी) या विषयात शासनमान्य संस्थेमधून किमान एक वर्षाचा पदविका किंवा प्रमाणपत्र अभ्यासक्रम उत्तीर्ण.<br>३. छायाचित्रण (फोटोग्राफी) च्या कामाचा तीन वर्षाचा अनुभव.<br>४. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |
| ५. | **ड्रॉफ्टसमन (स्थावर/रसायनशास्त्र)**<br>वेतन बँड : रू.९३००-३४८००<br>ग्रेड वेतन : रु.४४०० | क | **०१** | **अनु.जाती - ०१** | १. मान्यताप्राप्त संस्थेची स्थापत्य अभियांत्रिकी पदविका परीक्षा उत्तीर्ण.<br>२. इमारतीची सिव्हील ड्रॉईंग बनविण्याचा किमान पाच वर्षांचा अनुभव.<br>३. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |
| ६. | **सांख्यिकी सहायक**<br>वेतन बँड : रु.९३००-३४८००<br>ग्रेड वेतन : रु.४४०० | क | **०१** | **अनु.जाती - ०१** | १. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील पदवी संख्याशास्त्र हा मुख्य विषय घेऊन उत्तीर्ण.<br>**प्राधान्य :** संख्याशास्त्र विषयातील एम.ए. / एम.एस्सी. परीक्षा उत्तीर्ण.<br>२. सांख्यिकी सहायक म्हणून शैक्षणिक / औद्योगिक / शासकीय संस्थेमध्ये काम केल्याचा तीन वर्षांचा अनुभव.<br>३. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |
| ७. | **रासायनिक विश्लेषक (भूशास्त्र)**<br>वेतन बँड : रू.९३००-३४८००<br>ग्रेड वेतन : रु.४३०० | क | **०१** | **खुला - ०१** | १. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.एस्सी. (जिऑलॉजी/ॲनालिटिकल केमेस्ट्री) पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>**प्राधान्य** :- एम.एस्सी. ( जिऑलॉजी / ॲनालिटिकल केमेस्ट्री ) परीक्षा उत्तीर्ण.<br>२. शैक्षणिक/औद्योगिक/शासकीय संस्थेमधील भूशास्त्रीय नमुन्यांचे विश्लेषण करण्याच्या कामाचा किमान तीन वर्षांचा अनुभव.<br>३. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |
| ८. | **तंत्रसहायक (भूशास्त्र)**<br>वेतन बँड : रू.९३००-३४८००<br>ग्रेड वेतन : रु.४३०० | क | **०१** | **खुला - ०१** | १. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.एस्सी. (भूशास्त्र) पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>**प्राधान्य** : एम.एस्सी. (भूशास्त्र) परीक्षा उत्तीर्ण.<br>२. सूक्ष्मदर्शक, एएएस आणि डिटीए उपकरणे तसेच खडक आणि खनिजे यांचे पॉलिशिंग व ग्राईंडिंगसाठी वापरण्यात येणारी यंत्रे वापरण्याचा किमान तीन वर्षांचा अनुभव.<br>३. ओर मिनरल्स आणि क्ले मिनरल्ससंबंधी संशोधनाचा अनुभव असल्यास प्राधान्य.<br>४. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |

| अ. क्र. | पदनाम, वेतनबँड व ग्रेड वेतन | पदाचा गट | पद संख्या | आरक्षण | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| ९. | **सर्वेक्षक (पुरातत्व)**<br>वेतन बँड : रू.९३००-३४८००<br>ग्रेड वेतन : रु.४३०० | क | **०१** | **खुला - ०१** | १. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.ए./ बी.एस्सी. (मानवशास्त्र/पुरातत्व) पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>**प्राधान्य** :<br>एम.ए./एम.एस्सी. (मानवशास्त्र / पुरातत्व) परीक्षा उत्तीर्ण.<br>२. ग्रामीण भागात संबंधित काम करण्याचा शैक्षणिक/औद्योगिक/शासकीय संस्थेमधील किमान तीन वर्षांचा अनुभव.<br>३. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |
| १०. | **तांत्रिक सहायक (ग्रंथालय)**<br>वेतन बँड : रू.९३००-३४८००<br>ग्रेड वेतन : रु.४३०० | क | **०२** | **खुला - ०२** | १. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.लिब. पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>२. शैक्षणिक/ औद्योगिक/ शासकीय संस्थेमधील ग्रंथालयातील कामाचा किमान तीन वर्षांचा अनुभव.<br>३. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |
| ११. | **कार्यशाळा कार्यदेशक**<br>वेतन बँड : रू.९३००-३४८००<br>ग्रेड वेतन : रु.४३०० | क | **०२** | **अनु.जमाती - ०१**<br>**वि.जा.(अ) - ०१** | १. एस.एस.सी. आणि मॅकेनिकल अभियांत्रिकी पदविका परीक्षा उत्तीर्ण.<br>२. शैक्षणिक/ औद्योगिक/ शासकीय संस्थेमधील वेल्डिंग व त्या संबंधीच्या कामाचा किमान पाच वर्षांचा अनुभव.<br>३. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |
| १२. | **प्रमुख भांडाररक्षक**<br>वेतन बँड : रू.९३००-३४८००<br>ग्रेड वेतन : रु.४३०० | क | **०२** | **खुला - ०१**<br>**अनु.जमाती - ०१** | १. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी (प्राधान्याने विज्ञान शाखेची) परीक्षा उत्तीर्ण.<br>२. शैक्षणिक/औद्योगिक/शासकीय संस्थेमधील भांडार आणि खरेदी सहायक/ अधिकारी या पदाचा किमान तीन वर्षांचा अनुभव.<br>३. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |
| १३. | **मिस्त्री (स्थावर)**<br>वेतन बँड : रू.९३००-३४८००<br>ग्रेड वेतन : रु.४३०० | क | **०१** | **खुला - ०१** | १. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी पदवी परीक्षा उत्तीर्ण अथवा शासनमान्य स्थापत्य अभियांत्रिकी पदविका परीक्षा उत्तीर्ण.<br>२. शैक्षणिक/औद्योगिक/शासकीय संस्थेमधील स्थापत्य विषयक कामाचा पदवीधारकांसाठी तीन वर्षांचा आणि पदविकाधारकांसाठी पाच वर्षांचा अनुभव.<br>३. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |

| अ. क्र. | पदनाम, वेतनबँड व ग्रेड वेतन | पदाचा गट | पद संख्या | आरक्षण | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| १४. | **प्रयोगशाळा तंत्रज्ञ**<br>वेतन बँड : रू.९३००-३४८००<br>ग्रेड वेतन : रु.४३०० | क | **०१** | **वि.जा.(अ) - ०१** | १. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.एस्सी. पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>**प्राधान्य** : एम.एस्सी. परीक्षा उत्तीर्ण.<br>२. शैक्षणिक/ औद्योगिक/ शासकीय संस्थेमधील संशोधन प्रयोगशाळेतील उपकरण दुरुस्तीचा तसेच शास्त्रीय उपकरणाची देखभाल व चालविण्याचा किमान तीन वर्षांचा अनुभव.<br>३. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |
| १५. | **सहायक सुरक्षा अधिकारी**<br>वेतन बँड : रू.९३००-३४८००<br>ग्रेड वेतन : रु.४३०० | क | **०१** | **अनु.जमाती - ०१** | १. एस.एस.सी. अथवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण.<br>२. सैन्य दलातील नाईक अथवा हवालदार म्हणून किमान १० वर्षे सेवा आवश्यक.<br>३. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |
| १६. | **बांधकाम सहायक**<br>वेतन बँड : रू.९३००-३४८००<br>ग्रेड वेतन : रु.४२०० | क | **०१** | **खुला - ०१** | १. एस.एस.सी. आणि आय.टी.आय. गवंडी अभ्यासक्रम उत्तीर्ण.<br>२. गवंडी कामाचा किमान पाच वर्षांचा अनुभव.<br>३. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |
| १७. | **तंत्रसहायक (प्राणिशास्त्र)**<br>वेतन बँड : रू.५२००-२०२००<br>ग्रेड वेतन : रु.२८०० | क | **०१** | **खुला - ०१** | १. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.एस्सी. (प्राणीशास्त्र) पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>२. शैक्षणिक/ औद्योगिक/ शासकीय संस्थेच्या प्रयोगशाळेतील कामाचा किमान तीन वर्षांचा अनुभव.<br>३. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |
| १८. | **शुष्क वनस्पतीरक्षक (वनस्पतीशास्त्र)**<br>वेतन बँड : रु.५२००-२०२००<br>ग्रेड वेतन : रु.२८०० | क | **०१** | **खुला - ०१** | १. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.एस्सी. (वनस्पतीशास्त्र) पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>२. वनस्पती नमुने गोळा करणे व त्याचे वर्गीकरण तसेच जतन आणि संवर्धन करण्याच्या कामाचा शैक्षणिक/ औद्योगिक/ शासकीय संस्थेमधील किमान तीन वर्षांचा अनुभव.<br>३. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |
| १९. | **वरिष्ठ लिपीक**<br>वेतन बँड : रु.५२००-२०२००<br>ग्रेड वेतन : रु.२४०० | क | **०१** | **खुला - ०१** | १. एच.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण (पदवीधर असल्यास प्राधान्य.)<br>२. मराठी ३० श.प्र.मि. व इंग्रजी ४० श.प्र.मि. टंकलेखन शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>३. कनिष्ठ लिपीक या पदाचा किमान तीन वर्षांचा अनुभव.<br>४. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |
| २०. | **लघुटंकलेखक (मराठी)**<br>वेतन बँड : रु.५२००-२०२००<br>ग्रेड वेतन : रु.२४०० | क | **०६** | **खुला - ०३**<br>**अनु.जमाती - ०१**<br>**वि.जा. (अ) - ०१**<br>**विमाप्र - ०१** | १. एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण (पदवीधर असल्यास प्राधान्य)<br>२. मराठी लघुलेखन - ८० श.प्र.मि. आणि मराठी टंकलेखन - ३० श.प्र.मि. अर्हतेची शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. इंग्रजी लघुलेखन असल्यास प्राधान्य.<br>३. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |

| अ. क्र. | पदनाम, वेतनबँड व ग्रेड वेतन | पदाचा गट | पद संख्या | आरक्षण | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| २१. | **सुतार**<br>वेतन बँड : रु.५२००-२०२००<br>ग्रेड वेतन : रु.२४०० | क | **०१** | **खुला - ०१** | १. एस.एस.सी. आणि आय.टी.आय. (सुतार) उत्तीर्ण.<br>२. सुतार कामाचा किमान तीन वर्षांचा अनुभव.<br>३. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |
| २२. | **वायरमन**<br>वेतन बँड : रु.५२००-२०२००<br>ग्रेड वेतन : रु.२४०० | क | **०१** | **खुला - ०१** | १. एस.एस.सी.उत्तीर्ण आणि महाराष्ट्र शासनाचा वायरमन परवाना अथवा आय.टी.आय. वायरमन /इलेक्ट्रीशियन कोर्स उत्तीर्ण.<br>२. विद्युत वायरिंग/लाईनमन कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव.<br>३. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |
| २३. | **कनिष्ठ सहायक(सर्वसाधारण)**<br>वेतन बँड : रु.५२००-२०२००<br>ग्रेड वेतन : रु.२४०० | क | **६०** | **खुला - २४**<br>(पैकी ०८ महिला, ०४ माजी सैनिक, ०१ अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडू, ०१ भूकंपग्रस्त/प्रकल्पग्रस्त, ०३ पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवार)<br>**अनु.जाती - ०८**<br>(पैकी ०३ महिला, ०१ माजी सैनिक, ०१ पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवार)<br>**अनु.जमाती - १०**<br>(पैकी ०३ महिला, ०२ माजी सैनिक, ०१ अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडू, ०१ भूकंपग्रस्त /प्रकल्पग्रस्त, ०१ पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवार)<br>**वि.जा. (अ) - ०६**<br>(पैकी ०२ महिला, ०१ माजी सैनिक, ०१ पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवार)<br>**भ.ज.(ब) - ०१**<br>**भ.ज.(क) - ०६**<br>(पैकी ०२ महिला, ०१ माजी सैनिक, ०१ पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवार)<br>**भ.ज.(ड) - ०२**<br>**विमाप्र - ०३**<br>(उपरोक्त एकूण ६० पदांपैकी अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - ०१, श्रवण शक्तीतील दोष - ०१, चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायु - ०१ ) | १. एच.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण (पदवीधर असल्यास प्राधान्य.)<br>२. मराठी ३० श.प्र.मि. व इंग्रजी ४० श.प्र.मि. टंकलेखन शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>३. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |
| २४. | **कनिष्ठ सहायक (लेखा)**<br>वेतन बँड : रु.५२००-२०२००<br>ग्रेड वेतन : रु.२४०० | क | **२१** | **खुला - १०**<br>(पैकी ०३ महिला, ०२ माजी सैनिक, ०१ भूकंपग्रस्त /प्रकल्पग्रस्त, ०१ अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडू, ०१ पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवार)<br>**अनु.जाती - ०३**<br>**अनु.जमाती - ०२**<br>**भ.ज.(क) - ०१**<br>**भ.ज.(ड) - ०१**<br>**इमाव - ०४**<br>(पैकी ०१ महिला, ०१ माजी सैनिक)<br>(उपरोक्त एकूण २१ पदांपैकी अंधत्व किंवा क्षीणदृष्टी/श्रवण शक्तीतील दोष/ चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायु - १) | १. एच.एस.सी. (वाणिज्य) परीक्षा उत्तीर्ण (बी.कॉम. असल्यास प्राधान्य.)<br>२. मराठी ३० व इंग्रजी ४० श.प्र.मि. टंकलेखन शासकीय प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>३. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |

| अ. क्र. | पदनाम, वेतनबँड व ग्रेड वेतन | पदाचा गट | पद संख्या | आरक्षण | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| २५. | **तंत्रज्ञ नि आरेखक (रसायनशास्त्र)**<br>वेतन बँड : रु.५२००-२०२००<br>ग्रेड वेतन : रु.२००० | क | **०१** | **खुला - ०१** | १. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.एस्सी. (भौतिकशास्त्र/ रसायनशास्त्र/ इलेक्ट्रॉनिक सायन्स) पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>२. शैक्षणिक / औद्योगिक / शासकीय संस्थेतील रसायनशास्त्र प्रयोगशाळेतील यंत्राची देखभाल व वापराच्या कामाचा किमान तीन वर्षांचा अनुभव.<br>३. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |
| २६. | **कनिष्ठ लिपीक**<br>वेतन बँड : रु.५२००-२०२००<br>ग्रेड वेतन : रु.१९०० | क | **०१** | **खुला - ०१** | १. एच.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण (पदवीधर असल्यास प्राधान्य.)<br>२. मराठी ३० श.प्र.मि. व इंग्रजी ४० श.प्र.मि. टंकलेखन शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>३. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |
| २७. | **वाहनचालक**<br>वेतन बँड : रु.५२००-२०२००<br>ग्रेड वेतन : रु.१९०० | क | **०७** | **खुला - ०३**<br>**भ.ज.(ब) - ०१**<br>**इमाव - ०२**<br>**विमाप्र - ०१** | १. एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण.<br>२. जड आणि हलकी वाहने चालविण्याचा कायम स्वरुपी परवाना आणि किमान तीन वर्षांचा अनुभव.<br>३. वाहनाच्या यांत्रिक कामाचे ज्ञान असल्यास प्राधान्य. |
| २८. | **संग्रहालय स्वच्छक**<br>वेतन बँड :रु.४४४०-७४४०<br>ग्रेड वेतन : रु.१८०० | ड | **०१** | **खुला - ०१** | १. आठवी परीक्षा उत्तीर्ण.<br>२. शैक्षणिक / औद्योगिक / शासकीय संग्रहालयातील विधीका आणि शोकेसची स्वच्छता करणे, संग्रहालयातील वस्तूंच्या मांडणीच्या प्रदर्शनात मदत करण्याचा व क्षेत्रीय (Field Work) कामाचा किमान एक वर्षाचा अनुभव. |
| २९. | **ग्रंथालय परिचर**<br>वेतन बँड : रु.५२००-२०२००<br>ग्रेड वेतन : रु.१९०० | ड | **०६** | **खुला - ०३**<br>**अनु.जमाती - ०१**<br>**वि.जा.(अ) - ०१**<br>**इमाव - ०१** | १. एच. एस. सी. परीक्षा उत्तीर्ण आणि ग्रंथालयशास्त्रामधील पदविका / प्रमाणपत्र उत्तीर्ण.<br>२. शैक्षणिक / औद्योगिक / शासकीय ग्रंथालयातील कामाचा किमान एक वर्षाचा अनुभव. |
| ३०. | **खानसामा नि अतिथीगृह परिचर**<br>वेतन बँड : रु.५२००-२०२००<br>ग्रेड वेतन : रु.१९०० | ड | **०८** | **खुला - ०३**<br>**अनु.जाती - ०१**<br>**अनु.जमाती - ०१**<br>**वि.जा.(अ) - ०१**<br>**इमाव - ०२** | १. एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण.<br>२. शैक्षणिक/ औद्योगिक/ शासकीय अतिथीगृह अथवा हॉटेलमध्ये स्वयंपाकी काम केल्याचा किमान एक वर्षाचा अनुभव. |

| अ. क्र. | पदनाम, वेतनबँड व ग्रेड वेतन | पदाचा गट | पद संख्या | आरक्षण | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| ३१. | **कुशल कामगार**<br>वेतन बँड : रु.५२००-२०२००<br>ग्रेड वेतन : रु.१९००<br>(सुतार सहायक - ०३<br>गवंडी सहायक - ०३<br>नळ कारागीर सहायक - ०४<br>रंगकाम मदतनीस - ०२<br>वायरमन मदतनीस - ०६<br>पंप मदतनीस - ०२) | ड | **२०** | **खुला - ०७**<br>(पैकी ०२ महिला, ०१ माजी सैनिक)<br>**अनु.जाती - ०२**<br>**अनु.जमाती - ०२**<br>**भ.ज.(ब) - ०१**<br>**भ.ज.(क) - ०१**<br>**भ.ज.(ड) - ०१**<br>**इमाव - ०५**<br>(पैकी ०१ महिला, ०१ माजी सैनिक)<br>**विमाप्र - ०१** | १. एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण.<br>२. संबंधित कामाचा किमान एक वर्षाचा अनुभव. |
| ३२. | **झेरॉक्स् ऑपरेटर**<br>वेतन बँड : रु.५२००-२०२००<br>ग्रेड वेतन : रु.१९०० | ड | **०१** | **खुला - ०१** | १. एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण.<br>२. शैक्षणिक/ औद्योगिक/ शासकीय संस्थेमधील फोटोकॉपी काम केल्याचा किमान एक वर्षाचा अनुभव. |
| ३३. | **अंधारखोली सहायक**<br>वेतन बँड :रु.४४४०-७४४०<br>ग्रेड वेतन : रु.१८०० | ड | **०१** | **खुला - ०१** | १. एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण आणि शासनमान्य फोटोग्राफी प्रमाणपत्र अभ्यासक्रम उत्तीर्ण.<br>२. संबंधित कामाचा किमान एक वर्षाचा अनुभव. |
| ३४. | **वनस्पती समाहारक (वनस्पतीशास्त्र)**<br>वेतन बँड :रु.४४४०-७४४०<br>ग्रेड वेतन : रु.१८०० | ड | **०१** | **खुला - ०१** | १. एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण आणि शासनमान्य बगीचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम उत्तीर्ण.<br>२. बोटॅनिकल गार्डनची देखभाल करणे, वनस्पतींना खत, माती योग्य प्रमाणात घालणे, कटिंग (आकार) करणे तसेच वनस्पतींवर योग्य प्रमाणात औषधांची फवारणी करणे इत्यादी कामाचा किमान एक वर्षाचा अनुभव. |
| ३५. | **सेक्शन कटर ग्राइंडर**<br>(वनस्पतीशास्त्र)<br>वेतन बँड :रु.४४४०-७४४०<br>ग्रेड वेतन : रु.१८०० | ड | **०१** | **खुला - ०१** | १. एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण.<br>२. शैक्षणिक/ औद्योगिक/ शासकीय संस्थेमधील प्रयोगशाळेत काम केल्याचा किमान एक वर्षाचा अनुभव. |
| ३६. | **चक्रमुद्रित यंत्रचालक**<br>वेतन बँड :रु.४४४०-७४४०<br>ग्रेड वेतन : रु.१८०० | ड | **०२** | **खुला - ०१**<br>**अनु.जाती - ०१** | १. एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण.<br>२. शैक्षणिक / औद्योगिक / शासकीय संस्थेमधील फोटोकॉपी (झेरॉक्स) काम केल्याचा किमान एक वर्षाचा अनुभव. |

| अ. क्र. | पदनाम, वेतनबँड व ग्रेड वेतन | पदाचा गट | पद संख्या | आरक्षण | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| ३७. | **शिपाई**<br>वेतन बँड :रु.४४४०-७४४०<br>ग्रेड वेतन : रु.१६०० | ड | **५८** | **खुला - १९**<br>(पैकी ०६ महिला, ०३ माजी सैनिक, ०१ अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडू, ०१ भूकंपग्रस्त /प्रकल्पग्रस्त) | ८ वी उत्तीर्ण.<br>(एस. एस. सी. उत्तीर्ण असल्यास प्राधान्य) |
| | | | | **अनु.जाती - ०२** | |
| | | | | **अनु जमाती - ०५**<br>(पैकी ०१ महिला, ०१ माजी सैनिक) | |
| | | | | **वि.जा.(अ) - ०४**<br>(पैकी ०१ महिला, ०१ माजी सैनिक) | |
| | | | | **भ.ज.(ब) - ०२** | |
| | | | | **भ.ज.(क) - ०२** | |
| | | | | **भ.ज.(ब/क) - ०१** | |
| | | | | **भ.ज. (ड) - ०२** | |
| | | | | **इमाव - १९**<br>(पैकी ०६ महिला, ०३ माजी सैनिक, ०१ अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडू, ०१ भूकंपग्रस्त /प्रकल्पग्रस्त) | |
| | | | | **विमाप्र - ०२** | |
| ३८. | **ग्रंथालय शिपाई**<br>वेतन बँड :रु.४४४०-७४४०<br>ग्रेड वेतन : रु.१३०० | ड | **०१** | **खुला - ०१** | १. ८ वी उत्तीर्ण.<br>(एस. एस. सी. उत्तीर्ण असल्यास प्राधान्य)<br>२. ग्रंथालयातील कामकाजाचा एक वर्षाचा अनुभव |
| ३९. | **पहारेकरी**<br>वेतन बँड :रु.४४४०-७४४०<br>ग्रेड वेतन : रु.१३०० | ड | **१३** | **खुला - ०७**<br>(पैकी ०२ महिला, ०१ माजी सैनिक) | १. ८ वी उत्तीर्ण.<br>२. माजी सैनिक (संरक्षण दलातील किमान पाच वर्षाचा अनुभव) |
| | | | | **अनु.जाती - ०२** | |
| | | | | **अनु.जमाती - ०१** | |
| | | | | **विजा (अ) - ०१** | |
| | | | | **इमाव - ०२** | |
| | | | | (उपरोक्त एकूण १३ पदसंख्येपैकी श्रवण शक्तीतील दोष / चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायु - ०१) | |

| अ. क्र. | पदनाम, वेतनबँड व ग्रेड वेतन | पदाचा गट | पद संख्या | आरक्षण | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| ४०. | **हमाल**<br>वेतन बँड :रु.४४४०-७४४०<br>ग्रेड वेतन : रु.१३०० | ड | **१६** | **खुला - ०८**<br>(पैकी ०२ महिला, ०१ माजी सैनिक)<br>**अनु.जाती - ०२**<br>**अनु.जमाती - ०२**<br>**भ.ज.(ब) - ०१**<br>**इमाव — ०३**<br>(उपरोक्त एकूण १६ पदसंख्येपैकी अंधत्व किंवा क्षीणदृष्टी/श्रवण शक्तीतील दोष/ चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायु - १) | १. आठवी परीक्षा उत्तीर्ण.<br>२. अवजड कामे करण्याची क्षमता. |
| ४१. | **आरोग्य परिचर(आरोग्य केंद्र)**<br>वेतन बँड :रु.४४४०-७४४०<br>ग्रेड वेतन : रु.१३०० | ड | **०४** | **खुला - ०२**<br>**विजा (अ) - ०१**<br>**इमाव - ०१** | १. आठवी परीक्षा उत्तीर्ण.<br>२. सरकारी दवाखाना किंवा मोठया रूग्णालयातील संबंधित कामाचा किमान एक वर्षाचा अनुभव. |
| ४२. | **प्रयोगशाळा मदतनीस**<br>वेतन बँड :रु.४४४०-७४४०<br>ग्रेड वेतन : रु.१३०० | ड | **१६** | **खुला - ८**<br>(पैकी ०२ महिला, ०१ माजी सैनिक )<br>**अनु.जाती - ०१**<br>**अनु जमाती - ०१**<br>**भ.ज.(ब) - ०१**<br>**भ.ज.(क) - ०१**<br>**इमाव - ०३**<br>**विमाप्र - ०१**<br>(उपरोक्त एकूण १६ पदसंख्येपैकी श्रवण शक्तीतील दोष / चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायु - १) | १. आठवी परीक्षा उत्तीर्ण.<br>२. शैक्षणिक/ औद्योगिक/ शासकीय संस्थेमधील प्रयोगशाळेत काम केल्याचा किमान एक वर्षाचा अनुभव. |

## ❑ अर्ज करण्याची पद्धत व शुल्क :

१. यापूर्वी उपरोक्त पदांकरिता जाहिरात क्र.२६, दिनांक १४ मे, २०१० नुसार अर्ज मागविण्यात आलेले होते. सदर पदांच्या शैक्षणिक अर्हता आणि अनुभव तसेच सर्वसाधारण सूचनांमध्ये काही बदल करण्यात आलेले असल्याने नव्याने जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात येत आहेत. जाहिरात क्र.२६ अन्वये उपरोक्त पदांकरिता प्राप्त झालेले सर्व अर्ज रद्द करण्यात येत आहेत.

२. उमेदवारांची माहिती संगणकावर एकत्रित करण्यात येणार असल्याने वरील सर्व पदांसाठी विहीत केलेला ऑनलाईन (Online) अर्ज व संबंधित माहिती MKCL च्या **http://oasis.mkcl.org/unipune2013** या संकेत स्थळावर मिळेल.

३. उमेदवाराने विद्यापीठ व MKCL च्या संकेतस्थळावरील जाहिरात काळजीपूर्वक वाचावी.

४. उमेदवाराने, ऑनलाईन अर्ज ज्या पदासाठी भरणार आहे त्या पदाची शैक्षणिक व इतर पात्रता जाहिरातीमध्ये काळजीपूर्वक वाचावी.

५. अर्जाचे शुल्क खुल्या गटातील उमेदवारांसाठी रु.४००/- व मागासवर्गीय उमेदवारांसाठी रु.२००/- चलनाने बँकेत भरणे आवश्यक आहे. चलनाची प्रिंट आऊट काढून उमेदवाराने आवश्यक ते शुल्क बँक चार्जेससह भारतीय स्टेट बँकेत भरावे. सदर शुल्क हे ना परतावा राहील. माजी सैनिकांना अर्जासोबत शुल्क भरण्याची अट लागू नाही.

६. ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना उमेदवाराने सर्व आवश्यक कागदपत्रे आणि स्वतःचा अलिकडच्या काळातील पासपोर्ट आकाराचा रंगीत फोटो व सहीची scanned image स्वतः जवळ असणे आवश्यक आहे. उमेदवाराने स्वतःचा फोटो व सहीची scanned image संकेतस्थळावर दिलेल्या सूचनेनुसार विहित पद्धतीने अपलोड करणे अनिवार्य आहे.

७. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी MKCL च्या **http://oasis.mkcl.org/unipune2013** या संकेत स्थळावरील **"Apply Online"** हया लिंक वर क्लीक करून अर्ज भरण्यास सुरूवात करावी.

८. ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे ते पद निवडा. एक-एक करत आपणास विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे (Yes/No) यापैकी योग्य पर्याय निवडा, संगणक प्रणाली तुम्ही दिलेल्या उत्तरांच्या आधारे तुमची प्राथमिक पात्रता तपासेल.

९. जर प्राथमिक पात्रता चाचणीत आपण पात्र असाल तर ज्या विभागासाठी अर्ज भरायचा आहे तो विभाग निवडा आणि आवश्यक माहिती भरा.

१०. आवश्यक माहिती भरल्यानंतर संगणक प्रणाली तुमचा लॉगीन आय.डी., पासवर्ड आणि एस.बी.आय. चलन निर्माण करून तुम्हाला तुमच्या स्क्रीनवर लॉगीन आय.डी., पासवर्ड दाखवेल आणि तुम्ही दिलेल्या मोबाईल क्रमांकावर SMS करेल (कृपया आपण आपला मोबाईल क्रमांक अचूक टाकावा जेणेकरून आपल्याला लॉगीन आय.डी. आणि पासवर्डची माहिती आपल्या मोबाईल क्रमांकावर SMS द्वारे प्राप्त होईल). हा लॉगीन आय.डी. म्हणजेच तुमचा अर्ज क्रमांक असेल.

११. तुमच्या लॉगीन आय.डी. आणि पासवर्डची माहिती देऊन बँक चलनासाठी **"Print My Login Challan details"** हया बटनवर क्लीक करून प्रिंट काढावी.

१२. चलन प्राप्त केल्यानंतर कार्यालयीन कामकाजाच्या दुस-या दिवशी आपल्या नजीकच्या भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये जावून चलनावर दर्शविलेले शुल्क बँकेत जमा करावे. बँक तुम्हाला शुल्क जमा केल्याची पोहोच देईल.

१३. कृपया शुल्क, चलनावर दर्शवलेल्या अंतिम तारखेच्या आत भरा. एकदा भरलेली फी कोणत्याही कारणास्तव परत केली जाणार नाही.

१४. भारतीय स्टेट बँकेत चलनाद्वारे शुल्क भरल्यानंतर कार्यालयीन कामकाजाच्या दुस-या दिवशी उर्वरित ऑनलाईन अर्ज **"Fill Application Form/अर्ज भरा"** हया लिंकवर क्लीक करून अर्ज पूर्ण भरावा. भारतीय स्टेट बँकेत चलनाद्वारे शुल्क भरल्यानंतर अर्जदाराने अर्जामध्ये खालील माहिती भरून अर्ज पूर्ण करणे आवश्यक आहे त्याशिवाय आपला अर्ज पूर्ण होणार नाही.

- वैयक्तिक माहिती
- आरक्षण बद्दलची माहिती
- शैक्षणिक माहिती
- फोटो आणि सही अपलोड
- कामाचा अनुभव
- इतर आवश्यक माहिती

१५. वरील सर्व माहिती भरल्यानंतर अर्जाची प्रिंट काढून आपल्या माहिती साठी जतन करून ठेवावी.

१६. उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने स्विकारण्यात येणार असल्याने **अर्जाची प्रत, शैक्षणिक कागदपत्रे व इतर प्रमाणपत्रे पुणे विद्यापीठ किंवा एम.के.सी.एल ला पाठविण्याची आवश्यकता नाही.** तथापि ऑनलाईन अर्जामध्ये संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरताना काही त्रुटी राहिल्यास व अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

१७. तुमची अर्ज प्रक्रिया येथे पूर्ण होते.अर्जदाराने नियमितपणे सदर वेबसाईट चेक करावी.

१८. लेखी परीक्षेचे ओळखपत्र परीक्षेपूर्वी तुमच्या लॉगीन मध्ये व वेबसाईट वर उपलब्ध राहील. यासाठी वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

१९. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र,पुणे/कौशल्यविकास या कार्यालयात व आदिवासी विकास विभागाकडे नावनोंदणी केली असली तरी Online अर्ज करणे आवश्यक आहे. नावनोंदणी केलेले प्रमाणपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.

२०. अर्जामध्ये नमूद केलेली माहिती चुकीची अथवा खोटी आढळून आल्यास संबंधित उमेदवार दंडात्मक कारवाईस पात्र राहील. तसेच चुकीच्या माहितीच्या आधारे नियुक्ती झाल्यास तात्काळ सेवेतून काढून टाकणेस पात्र राहील व भा.दं.वि.संहिताचे कलम १९९ व २०० प्रमाणे कारवाईस पात्र राहील.

२१. ऑनलाईन अर्ज भरतांना कोणतीही तांत्रिक अडचण उद्‌भवल्यास महाराष्ट्र ज्ञान महामंडळ,पुणे **(MKCL)** यांच्या **९३२६५५२५२५** या दुरध्वनीक्रमांकावर संपर्क साधावा.

## ❑ अर्ज व परीक्षा शुल्क भरण्याची विहित मुदत :

१. ऑनलाईन अर्ज नोंदणी करण्याचा कालावधी **रविवार, दिनांक २३/०६/२०१३ ते शनिवार, दिनांक १३/०७/२०१३.**

२. संगणकीय चलनाद्वारे भारतीय स्टेट बँक च्या शाखांमध्ये शुल्क स्वीकृतीचा कालावधी **सोमवार, दिनांक २४/०६/२०१३ ते बुधवार, दिनांक १७/०७/२०१३.**

३. शुल्क बँकेत जमा केल्यानंतर ऑनलाईन अर्ज भरण्याचा कालावधी **मंगळवार, दिनांक २५/०६/२०१३ ते शुक्रवार, दिनांक १९/०७/२०१३.**

## ❑ वयोमर्यादा :

१. अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकास वयोमर्यादा गणली जाईल.

२. उमेदवाराचे वय अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकास किमान १८ वर्षे पूर्ण व कमाल खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी ३३ वर्षे आणि मागासवर्गीय उमेदवारांसाठी ३८ वर्षे अशी राहिल.

३. सर्व मान्यताप्राप्त विद्यापीठे आणि अशा विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था तसेच शासकीय/ निमशासकीय कार्यालयांमध्ये नियमित वेतनश्रेणीतील कायमस्वरूपी पदावर कार्यरत सेवकांसाठी उच्चतम वयोमर्यादेची अट लागू नाही.

४. खुल्या तसेच राखीव प्रवर्गातील प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, अपंग व स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना वयोमर्यादा वयाच्या ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

५. महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक ३० एप्रिल, २००५ च्या शासन निर्णय क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ मधील तरतूदीनूसार अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी राखीव असलेल्या पदांसाठी खेळांडूची गुणवत्ता व पात्रता विचारात घेवून वयोमर्यादा विहित वयोमर्यादेपेक्षा पाच वर्षे शिथिलक्षम राहील.

६. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र. पअंक - १००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ दिनांक २७ ऑक्टोबर, २००९ मधील तरतुदीनुसार गट ‘क’ मधील पदांसाठी ‘सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य’ या योजनेंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या अंशकालीन उमेदवारांकरीता उच्चतम वयाची अट वयाच्या ४६ वर्षे पर्यंत शिथिलक्षम राहील.

७. माजी सैनिक सशस्त्र दलात किमान ६ महिने सेवा केलेल्या माजी सैनिकामधील, त्यांनी सशस्त्र दलात केलेला अखंड सेवाकाल अधिक ३ वर्षे एवढा काल त्यांच्या विहित दिनांकाच्या वयातून वगळून त्या दिनांकास येणारे त्यांचे वय विचारात घेतले जाईल.

८. जनगणना (सन१९९१ ची) उमेदवारांसाठी कार्यालयातील सलग सेवेचा कालावधी अधिक ५ वर्षे शिथील केली जाईल. त्याबाबत अर्जदार / उमेदवार यांनी शासन निर्णय क्र. १०९७/प्र.क्र.७७/९७१६-अ, दि.१२/३/१९९८ मधील निकष पुर्ण केलेले असावे.

## ❑ खेळाडूसाठी अर्हता :

१. सदर खेळाडूने सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार पदासाठी आवश्यक असलेली किमान शैक्षणिक व इतर अर्हता प्राप्त केलेली असावी.

२. खेळाडू या समांतर आरक्षित पदांसाठी त्या त्या खेळांच्या वैयक्तिक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धामध्ये किमान राज्य अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम,व्दितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण,रौप्य किंवा कास्य पदक प्राप्त करणारा खेळाडू असावा. राज्य अजिंक्यपद स्पर्धा या सदर खेळांच्या अथवा महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनशी संलग्न असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात अथवा महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनने स्वतः आयोजित केलेल्या असाव्यात. किमान प्राविण्यापेक्षा उच्च स्तरावरील क्रिडा प्राविण्य मिळविणा-या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. वैयक्तिकरित्या किंवा आमंत्रित स्वरुपाच्या स्पर्धामध्ये भाग घेतलेल्या खेळांडूचा यासाठी विचार करण्यात येणार नाही.

३. खेळाडूंनी सादर केलेल्या प्रमाणपत्राची व पात्रतेची मा. संचालक, क्रिडा संचालनालय यांचेकडुन शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनांनुसार आहे किंवा नाही हे तपासून घेण्यात येईल व तदनंतरच पात्र उमेदवारांना नेमणुक पत्र/आदेश निर्गमित करण्यात येईल.

## ❑ अपंगासाठीचे आरक्षण :

१. अपंग व्यक्तींसाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणाचा व वयोमर्यादेतील सवलतीचा लाभ मिळविण्यासाठी अपंगत्वाचे प्रमाण किमान ४० टक्के असणे आवश्यक आहे. त्या संबंधीचे जिल्हा शल्यचिकित्सक किंवा केंद्र / राज्य शासनाने यासाठी स्थापन केलेली मंडळे यांचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

२. फक्त कायम स्वरुपाचे अपंगत्व असलेल्या उमेदवारांनाच अपंग व्यक्तींसाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणाचे व वयोमर्यादेतील सवलतींचे फायदे देय असतील. तात्पुरत्या स्वरुपातील अपंगत्वाचे प्रमाणपत्र असलेल्या उमेदवारांना अपंग व्यक्तींसाठी असलेले कोणतेही फायदे देय नाहीत.

३. अपंग प्रवर्गासाठी नमूद केलेले आरक्षण अंध / अल्पदृष्टी, कर्णबधीर, अस्थिव्यंग या क्रमाने अंतर्गत परिवर्तनिय असेल.

## ❑ मागासवर्गीयांचे आरक्षण :

१. जातीच्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ महाराष्ट्र अनु.जाती, अनु.जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम - २००० मधील तरतुदींनुसार सक्षम प्राधिका-याकडून प्रदान करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.

२. वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र. आणि इ.मा.व. प्रवर्गाच्या उमेदवारांनी समाजातील उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत नसल्यास तसे अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करणे व त्याबाबतच्या नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत कागदपत्रांच्या छाननीच्या वेळेस सादर करणे बंधनकारक राहील अन्यथा अशा उमेदवारांचा मागासवर्गाचा दावा ग्राह्य धरला जाणार नाही. (आर्थिक वर्ष २०१२-१३ चे दिनांक १ एप्रिल, २०१३ नंतर सक्षम अधिका-याने निर्गमित केलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र ग्राहय धरले जाईल.)

३. उन्नत व प्रगत गटामध्ये मोडणा-या वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र. आणि इ.मा.व. प्रवर्गातील तसेच खुल्या गटातील महिला उमेदवारांना वयोमर्यादा, आरक्षण या सवलतींसह कोणत्याही सवलतीस पात्र समजले जाणार नाही.

४. सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२ डिसेंबर, २०११ नुसार मागास प्रवर्गाच्या उमेदवारांना त्यांचे जातवैधता प्रमाणपत्र नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत सादर करण्याच्या अटीवर व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अधीन राहून नियुक्ती दिली जाईल. नियुक्ती दिल्यावर जात पडताळणीसाठीचा प्रस्ताव हा पडताळणी समितीकडे सादर केल्याची पोहोच कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

५. सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम मधील तरतुदीनुसार विमुक्ती जाती (अ), भटक्या जमाती (ब),(क),(ड) प्रवर्गासाठी विहित केलेले आरक्षण अंतर्गत परिवर्तनिय असेल.

## ❑ महिलांसाठीचे आरक्षण :

१. भरतीच्या वर्षात त्या त्या प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाही तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमार्फत भरण्यात येईल.

२. वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र. आणि इ.मा.व. प्रवर्गाचा दावा करणा-या आणि खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांनी समाजातील उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत नसल्यास तसे अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करावे व त्याबाबतच्या नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत कागदपत्रांच्या छाननीच्या वेळेस सादर करणे बंधनकारक राहील अन्यथा अशा उमेदवारांचा आरक्षणाचा दावा ग्राह्य धरला जाणार नाही. (आर्थिक वर्ष २०१२-१३ चे दिनांक १ एप्रिल, २०१३ नंतर सक्षम अधिका-याने निर्गमित केलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र ग्राहय धरले जाईल.)

## ❑ लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापनः

१. शासनाने शासकीय विभागातील गट - अ,ब,क आणि ड मधील पदांच्या सेवाप्रवेशासाठी एक आवश्यक अर्हता म्हणून महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५, दिनांक २८ मार्च, २००५ च्या अधिसूचनेद्वारे लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन विहित केले आहे. या नियमांतील तरतुदींनुसार शासकीय सेवेतील पदासाठी अर्ज करतांना अर्जासोबत उमेदवाराने विहित नमुन्यातील प्रतिज्ञापन सादर करणे आवश्यक आहे.

२. प्रतिज्ञापनात नमूद केल्यानुसार हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या अपत्यामुळे उमेदवार विद्यापीठ सेवेतील नियुक्तीसाठी अनर्ह ठरविण्यात येईल.

## ❑ लेखी परीक्षा :

१. सदर जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पदांसाठी लेखी परीक्षा घेण्यात येणार असल्याने लेखी परीक्षा संदर्भातील सविस्तर माहिती **http://oasis.mkcl.org/unipune2013** या संकेतस्थळावर त्या-त्या वेळी प्रसिध्द करण्यात येईल. त्यामुळे भरतीप्रक्रिया पूर्ण हाईपर्यंत कृपया उमेदवारांनी वरील संकेतस्थळावरील माहिती वेळोवेळी पाहावी.

२. शासन निर्णय क्र.प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, दिनांक १९ ऑक्टोबर,२००७ मधील तरतुदीनुसार ज्या पदाकरिता कमीत कमी अर्हता माध्यामिक शालांत परीक्षा (इयत्ता १० वी) आहे अशा पदांकरिता परीक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जाच्या समान असेल व ज्या पदांकरिता पदवी ही कमीत कमी अर्हता आहे अशा पदांकरिता परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. परंतु मराठी या विषयाच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १२ वी) च्या दर्जाच्या समान राहील.

३. उमेदवाराची लेखी परीक्षा ही उमेदवाराची कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी न करता घेतली जाणार असल्यामूळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवारांची गुणवत्तेच्या आधारे सामाजिक/समांतर आरक्षण निहाय अंतिम निवड केली जाईल.

४. शासन निर्णय क्र.प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/१३-अ, दिनांक २७ जून, २००८ नुसार **उमेदवाराने लेखी परीक्षेमध्ये किमान ४५ % गुण प्राप्त करणे आवश्यक राहील** तसेच अंतिम गुणवत्ता यादीत अंतर्भाव होण्यासाठी उमेदवाराने एकूण गुणांच्या किमान ४५ % गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

५. परीक्षेचा निकाल तयार करताना परीक्षेत ज्या उमेदवारांचे समान गुण असतील अशा उमेदवारांचे गुणवत्ताक्रम शासन निर्णय क्रमांक प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, दिनांक २७ जून, २००८ मधील निकषांनुसार क्रमवार लावला जाईल.

६. परीक्षेकरिता अथवा अभ्यासक्रमाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचे संदर्भ पुस्तक विद्यापीठातर्फे पुरविण्यात येत नाही. त्यामुळे अशा स्वरुपाच्या कोणत्याही चौकशीची दखल घेण्यात येणार नाही व अशा चौकशीच्या संदर्भातील पत्रे कोणतीही कार्यवाही न करता परस्पर दप्तरी दाखल करण्यात येईल.

७. परीक्षेच्यावेळेस परीक्षा-कक्षात किंवा परीक्षा-केंद्राच्या परिसरात, तसेच कौशल्य चाचणी व मुलाखतीच्यावेळी विद्यापीठाच्या कार्यालयात किंवा परिसरात भ्रमण-ध्वनी (मोबाईल फोन) अथवा इतर संपर्काची साधने वापरण्यास मनाई आहे. सदर सूचनांचे उल्लंघन करणारा उमेदवार अपात्रतेच्या कारवाईस पात्र ठरेल.

८. लेखी परीक्षेच्या गुणांची पडताळणी अथवा फेरतपासणी करण्याबाबतची निवेदने कोणत्याही परिस्थितीत विचारात घेण्यात येणार नाहीत.

## ❑ परीक्षेचे स्वरुप :

| अ.क्र. | पद क्रमांक | लेखी परीक्षा | | | | | मौखिक व इतर चाचणी परीक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण गुण | मराठी | इंग्रजी | सामान्य ज्ञान | अंकगणित | |
| १ | पद क्र. १ ते १५, १७, १८, २५ | २०० | ५० | ५० | ५० | ५० | लेखी परीक्षेतून पात्र ठरलेल्या उमेदवारांची २५ गुणांची तोंडी परीक्षा घेतली जाईल. |
| २ | पद क्र. १६, २०, २१, २२, २७ | १०० | २५ | २५ | २५ | २५ | लेखी परीक्षेतून पात्र ठरलेल्या उमेदवारांसाठी :<br>१. व्यावसायिक चाचणी - ८० गुण<br>२. मुलाखत - २० गुण |
| ३ | पद क्र. १९, २३, २४, २६ | २०० | ५० | ५० | ५० | ५० | लेखी परीक्षेतून पात्र ठरलेल्या उमेदवारांसाठी<br>१. संगणकावर मराठी टंकलेखन चाचणी - २५ गुण<br>२. संगणकावर इंग्रजी टंकलेखन चाचणी - २५ गुण |
| ४ | पद क्र. २८ ते ४२ | ७५ | २५ | - | २५ | २५ | लेखी परीक्षेतून पात्र उमेदवारांची २५ गुणांची तोंडी परीक्षा घेतली जाईल. |

(वरील लेखी परीक्षेच्या सर्व प्रश्नपत्रिका वस्तूनिष्ठ आणि बहूपर्यायी स्वरूपाच्या असतील.)

## ❑ निवड प्रक्रीया व नियुक्ती :

१. लेखी परीक्षेनंतर परीक्षेस बसलेल्या सर्व उमेदवारांची (गटनिहाय/पदनिहाय) लेखी परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे अंतरीम एकत्रित गुणवत्ता यादी संकेतस्थळावर जाहिर केली जाईल.

२. या एकत्रित गुणवत्ता यादीतून सामाजिक/समांतर आरक्षण निहाय अंतरीम गुणवत्ता यादी संकेतस्थळावर जाहिर केली जाईल.

३. परीक्षेचे स्वरूपातील अ.क्र. ३ मधील पदांसाठी लेखी परीक्षेतील गुणानुक्रमे उमेदवारांपैकी कागदपत्रांच्या छाननीनंतर पात्र ठरणा-या उमेदवारांमधून रिक्त पदसंख्येच्या १ : ५ याप्रमाणे उमेदवारांची २५ गुणांची संगणकावर मराठी टंकलेखन चाचणी व २५ गुणांची संगणकावर इंग्रजी टंकलेखन चाचणी असे दोन्हीचे मिळून ५० गुण आणि लेखी परीक्षेचे २०० गुण अशा एकूण २५० गुणांपैकी गुणांनुक्रमे (Meritwise) पात्र ठरणा-या उमेदवारांची नियुक्ती करण्यात येईल.

४. ज्या पदांसाठी व्यावसायिक परीक्षा, प्रात्यक्षिक परीक्षा नाही, अशा पदावरील ज्या उमेदवारांचा गुणवत्ता यादीमध्ये अंतर्भाव होईल, अशा उमेदवारांची यादी **http://oasis.mkcl.org/unipune2013** या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल. अशा उमेदवारांनी संकेतस्थळावर दिलेल्या सूचनांनुसार त्यांच्या कागदपत्र छाननीसाठी ठरवून दिलेल्या दिनांकास, वेळेवर व ठरवून दिलेल्या ठिकाणी मूळ कागदपत्रे व छायांकीत (साक्षांकीत) प्रतीसह स्वखर्चाने उपस्थित राहणे आवश्यक राहील. सदर दिवशी, वेळेत व ठिकाणी सदर उमेदवार कागदपत्र छाननीसाठी अनुपस्थित राहील्यास, त्याचे नांव गुणवत्ता यादीतून काढून टाकले जाईल. याबाबत कोणतीही विनंती/तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

५. ज्या पदासाठी प्रात्यक्षिक परीक्षा/मौखीक परीक्षा आहे, अशा पदांची वरील (१) व (२) मध्ये दर्शविलेनुसार तयार करण्यात आलेल्या गुणवत्ता यादीतील उमेदवारांना प्रात्यक्षिक/मौखिक परीक्षेस बोलविले जाईल. अशा उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांची छाननी मुलाखतीपूर्वी करण्यात येईल. उमेदवारांची कागदपत्रे वैध नसल्यास मुलाखत घेतली जाणार नाही.

६. उमेदवारांनी प्रात्यक्षिक/व्यावसायिक/कौशल्य चाचणी तसेच मुलाखती करीता ठरवून दिलेल्या दिनांकास, वेळेवर व ठरवून दिलेल्या ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित राहणे आवश्यक राहील.

७. एकाच पदासाठी (Post) दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण मिळाल्यास सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र.प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, दिनांक २७ जून, २००८ नुसार खालील प्राधान्यक्रमाच्या आधारे उमेदवाराची अंतिम निवड केली जाईल.
   १. अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणारे उमेदवार, त्यानंतर
   २. मागसवर्गीय व मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत प्रथम अनुसूचित जमाती, नंतर अनुसूचित जाती, विशेष मागास प्रवर्ग, विमुक्त जाती (१४ व तत्सम जाती, भटक्या जमाती, जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जमाती, भटक्या जमाती (धनगर व तत्सम)), इतर मागासवर्ग या क्रमाने, त्यानंतर
   ३. शारीरिकदृष्ट्या अपंग असलेले उमेदवार, त्यानंतर
   ४. माजी सैनिक असलेले उमेदवार, त्यानंतर
   ५. स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य असलेले उमेदवार, त्यानंतर
   ६. वय (वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवाराचा क्रम वरती लागेल)
   वरील प्रत्येक संवर्गामध्ये महिलांना अग्रक्रम देण्यात येईल.
८. उमेदवाराने लेखी/व्यावसायिक/प्रात्यक्षिक/मौखिक या परीक्षेत मिळालेल्या एकत्रित गुणांच्या आधारे व त्या उमेदवाराची कागदपत्रे वैध ठरल्यास अंतिम निवड यादी तयार केली जाईल.अंतरीम निवड यादीमधून पदांच्या सामाजिक/समांतर आरक्षणानुसार व पदांच्या उपलब्धतेनुसार उमेदवारांची अंतिम निवड यादी तयार केली जाईल.
९. अंतिम निवड झालेल्या उमेदवाराने नियुक्ती आदेश निर्गमित होणेपूर्वी नियुक्ती अधिका-यांकडे सर्व मूळ कागदपत्रे वैधता तपासणीसाठी सादर करणे अनिवार्य आहे. त्यानंतरच उमेदवाराचे नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील.
१०. नियुक्तीचे ठिकाणी उमेदवारांना स्वखर्चाने जावून रूजू होणे अनिवार्य आहे.
११. अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना सेवेत रूजू झाल्यानंतर संबंधीत पदास आवश्यक व विहीत केलेली खातेनिहाय / अन्य परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे.

### ❑ इतर सूचना :

१. ऑनलाईन अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकास असलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव व वय ग्राहय धरण्यात येईल.
२. अनुभवाच्या बाबतीत तासिका, नियतकालिक, अशंकालिक, विद्यावेतन, अभ्यागत, अंशदानात्मक, विनावेतन तत्वावर केलेला अंशकालिक सेवेचा कालावधी तसेच प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राहय धरला जाणार नाही.
३. शासनाने भरतीबाबत / नियुक्तीबाबत वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रक, आदेश इत्यादी या भरती प्रक्रियेला लागू राहतील.
४. पात्र उमेदवाराची निवड झाल्यास विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील कार्यालयांमधील आस्थापनांमध्ये नियुक्ती अथवा बदली करण्यात येईल.
५. अर्जदारांनी नावातील बदलाबाबत शासन राजपत्राची साक्षांकित प्रत, विशेषतः महिला उमेदवारांनी नावातील बदलाबाबत विवाह नोंदणी प्रमाणपत्र अथवा शासन राजपत्राची साक्षांकित प्रत कागदपत्रांच्या छाननीच्या वेळेस सादर करणे बंधनकारक राहील.
६. लेखी/व्यावसायिक/प्रात्यक्षिक/मौखिक परीक्षा व या भरती प्रकियेसंदर्भात या कार्यालयाकडून वेळोवेळी प्रसिध्द होणारी माहिती व सूचना **http://oasis.mkcl.org/unipune2013** या संकेतस्थळावर प्रसिध्द होणार असल्याने भरतीप्रक्रिया पूर्ण होईपर्यंत उमेदवारांनी वरील संकेतस्थळावरील माहिती वेळोवेळी पाहावी. यासंबंधी विद्यापीठ कार्यालयात दूरध्वनीद्वारे / प्रत्यक्ष संपर्क साधू नये.
७. दिनांक ०१ नोव्हेंबर, २००५ नंतर शासनमान्य पदावर नियुक्ती झालेल्यांना महाराष्ट्र शासन, वित्त विभागाच्या परिपत्रक क्र.अंनियो १००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१ ऑक्टोबर, २००५ नुसार नवीन परिभाषित अशंदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील.
८. अर्जदाराने अर्ज करतेवेळी शिक्षण, वय, पदासाठी असलेले आरक्षण याबाबी विचारात घेऊन प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज ऑन लाईन (Online) भरावा.
९. ज्या राखीव प्रवर्गासाठी पद आरक्षित आहे, त्याच राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी त्या पदासाठी अर्ज करावेत. (जातीच्या प्रमाणपत्राची प्रत आणि जातवैधता प्रमाणपत्राची प्रत कागदपत्रांच्या छाननीच्या वेळेस सादर करणे बंधनकारक राहील.)
१०. उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा.
   अ) शासन निर्णय क्र. रिपभ/प्र.क्र. ६६/२०११/ई-१०, दि. २७ जून, २०११ नुसार ज्या उमेदवारांकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उपलब्ध नसल्यास त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्म दाखला सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात अधिवास प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही.
   ब) सदर उमेदवाराकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्मतारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या उमेदवाराने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याचा दाखल्यामध्ये त्या उमेदवाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे. अशा प्रकरणातदेखील अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही.

क) उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या उमेदवारांसाठी लागू राहतील. इतर उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील.

११. सध्या सेवेत असणा-या उमेदवारांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने भरावे व नियोक्त्याचे मूळ ना-हरकत प्रमाणपत्र व वेतनचिठ्ठी / वेतन प्रमाणपत्र कागदपत्रांच्या छाननीच्या वेळेस सादर करणे आवश्यक राहील.

१२. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक प्रशासन २००/प्र.क्र./२००१/३२, दिनांक २० जुलै, २००२ नुसार अनुषंगिक सुधारित शासन निर्णयान्वये उपरोक्त पदांकरिता अर्ज करणा-या उमेदवारांनी संगणक हाताळणी / वापराबाबतचे खाली नमूद केलेल्या पैकी एक प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

(अ) डी.ओ.इ.ए.सी.सी संस्थेच्या अधिकृत 'सी.सी.सी.' किंवा 'ओ' स्तर, किंवा 'ए' स्तर किंवा 'बी' स्तर किंवा 'सी' स्तर यापैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

(ब) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत एम.एस.सी.आय.टी. परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र.

(क) माहिती व तंत्रज्ञान (सामान्य प्रशासन विभाग) कडील शासन निर्णय क्रमांक मातंस २०१२/प्र.क्र. २७७/३९, दिनांक ४ फेब्रुवारी, २०१३ अन्वये नमूद केलेल्या संगणक / माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण असल्याचे समजण्यात येईल.

१३. ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे लेखी परीक्षेस / मुलाखतीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास, खोटी माहिती पुरविल्यास, एखादया अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी विद्यापीठ निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर बाद करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता अशा उमेदवाराची नियुक्ती समाप्त करण्यात येईल व त्याच्या विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१४. मुलाखत/नेमणूक यापैकी कोणत्याही टप्प्यावर टपालखात्याकडून उमेदवारास वेळेवर पत्र न मिळाल्यास अथवा विद्यापीठ संकेतस्थळावरील भरती प्रक्रियेसंदर्भात प्रसिध्द केलेल्या सूचना व माहितीची उमेदवाराने नोंद न घेतल्यास त्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही अथवा म्हणणे ऐकून घेतले जाणार नाही.

१५. जाहिरातीत नमूद केलेल्या पदांचे आरक्षण बिंदू नामावली नोंदवही तपासणीनुसार व तपासणीस अधीन राहून दर्शविण्यात आलेले आहे. बिंदू नामावली नोंदवहया फेरतपासणीअंती जाहिरातीतील पदांच्या संख्येमध्ये कमी / जास्त बदल होण्याची शक्यता आहे. परीक्षेचा प्रकार, पदाची संख्या, आरक्षण याबाबत बदल करणे, परीक्षा कोणत्याही टप्प्यावर स्थगित करणे वा रद्द करणे आणि अंशत बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार विद्यापीठ प्रशासन हे स्वतःकडे ठेवत आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही अथवा न्यायालयात दाद मागता येणार नाही. तसेच भरती प्रक्रियेसंदर्भात वाद, तक्रारीबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना राहील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. याबाबत कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.

१६. ज्या उमेदवारांनी त्यांचे नांव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र / सेवायोजन कार्यालय / समाजकल्याण कार्यालय / आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी / जिल्हा सैनिक बोर्ड कार्यालयात नांवे नोंदविली आहेत अशा उमेदवारांनी देखील स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहील. तसेच प्रकल्पग्रस्त, अंशकालीन इत्यादी समांतर आरक्षणातंर्गत येणा-या उमेदवारांनी देखील पुणे विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर स्वतंत्रपणे ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांनी अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही. अशा उमेदवारांना या कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही.

१७. अर्ज स्विकारणे किंवा नाकारणे याबाबत विद्यापीठामार्फत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१८. जाहिरातीमधील नमूद पदे भरणे किंवा न भरणे याचा हक्क विद्यापीठाने राखून ठेवलेला आहे.

**जाहिरात क्रमांक :२७** **(डॉ.नरेंद्र मा.कडू)**
**दिनांक : २२/०६/२०१३** **कुलसचिव**